# प्रतीक्षा पांगे यांचा सायबर सुरक्षा जनजागृती बद्दल; माननीय राज्यपाल सी.पी.0 राधाकृष्णन यांच्या हस्ते सत्कार




**उमरगा प्रतिनिधी**

आजकालच्या वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल जनमनसामध्ये जागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर व जवळपासच्या धाराशिव, सोलापूर, परभणी जिल्हा मधील शाळा, कॉलेज व समाजातील अनेक घटकातील जवळ पास सत्तर हजारापेक्षा जास्त लोकांमध्ये सायबर सेक्युरिटी बद्दल महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बी. एस्सी. सी.एस. च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

उमरगा तालुका, कोरेगाव गावची कन्या कु. प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला क्विक हिल फाउंडेशन चा बेस्ट सेक्रेटरी रनर अप -१ हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय श्री सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जून २०२४ मध्ये कु. प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनी चा पुणे येथे क्विक हिल फाउंडेशन कंपनीमध्ये क्यूएचएफ आर.एस .एम. एल क्लब साठी सेक्रेटरी पद म्हणून निवड झाली.गेल्या सहा महिन्यांमध्ये तिने सेक्रेटरी पदी असताना क्लब मार्फत जास्तीत जास्त लोकां पर्यंत सायबर सेक्युरिटी ची माहिती देण्याचे काम केले. गेल्या सहा महिन्यांपासून सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर व धाराशिव जिल्ह्यामधील शाळा, कॉलेजेस मध्ये जाऊन कु. प्रतीक्षा रमेश पांगे हिने सायबर सुरक्षा वर जनजागृती केली, ह्या माध्यमातून तिने उमरगा शहरातील मलंग विद्यालय, भारत विद्यालय, आदर्श विद्यालय, पोदार स्कूल, शिवाजी महाविद्यालय, इत्यादी... मध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सायबर फ्रॉड्स बद्दल माहिती दिली. तसेच तिने कोरेगाव येथील शेतकरी वर्ग, उमरगा न्यायाधीश,गणराज गणेश मंडळ, एल. डी .सी.सी बँक, लातूर, उमरगा आमदार ऑफिस, इत्यादी ठिकाणी जाऊन इम्पॅक्ट क्टिव्हिटी घेतली, ह्या मधून तिने एक हजारा पेक्षा जास्त लोकांना माहिती दिली.गावकऱ्यांनी तिच्या यशाचे कौतुक आज केले.